विशेष दिवाणी दावा क्र ११६/२०२३
फेडरल बँक वि भाग्यश्री
निशाणी क्र १२

**वादी तर्फे साक्षीदार क्रमांक १ - आनंद वसंत रायभान, वय – ३९ वर्षे, धंदा - नोकरी, राहणार - बार्शी, तालुका बार्शी, जिल्हा सोलापूर.**

**१.** शपथेवर निवेदन करतो की, पुरावा शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आलेला असून तो मी वाचून त्यावर माझी स्वाक्षरी केली आहे. शपथपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**२.** दावा मागणीच्या समर्थनार्थ वादी बँकेकडुन खालील कागदपत्रे दाखल करण्यात आले आहेत.

1. वादी बँकेने माझे लाभात करुन दिलेले मुखत्यापत्राची नक्कल, **निशाणी १२/१**.
2. प्रतिवादीचा कर्ज मागणी मुळ अर्ज, **निशाणी १२/२**.
3. कर्ज मंजूरीचे मुळ पत्रे, **निशाणी १२/३ व १२/४**.
4. कर्ज कराराच्या मुळ प्रती, **निशाणी १२/५ व १२/६**.
5. प्रतिवादीने वादी बँकेच्या लाभात करुन दिलेले गहाणखताचा मुळलेख, **निशाणी १२/७**.
6. प्रतिवादी क्र १ ते ३ ची दिनांक २९.०९.२०१५ रोजीचे मुळ प्रॉमिसरी नोट्स, **निशाणी १२/८ व १२/९**.
7. घोषणापत्रे मुळ, **निशाणी १२/१० व १२/११**.
8. तारण मालमत्ता पत्र मुळ, **निशाणी १२/१२**.
9. बॅलन्स कन्फरमेशन मुळ पत्रे, **निशाणी १२/१३ व १२/१४**.
10. प्रतिवादींना दिलेली नोटीसीची स्थळप्रत, **निशाणी १२/१५**.
11. पोस्टाच्या पावत्या, **निशाणी १२/१६**.
12. प्रतिवादींच्या कर्ज खाते उतारे, **निशाणी १२/१७ व १२/१८**.
13. भारतीय पुरावा कायदा, कलम ६५-ब प्रमाणेचे प्रमाणपत्र, **निशाणी १२/१९**.

KARADE RATILAL MACHINDRA

Digitally signed by KARADE RATILAL MACHINDRA
Date: 2025.11.13 13:46:38 +0530

(आर एम कराडे)

दिनांक - १३/११/२०२५.

दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, माढा.